# नव्या शैक्षणिक धोरणाची रचना

**डॉ. एस. पी. झांबरे,**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
एस. एस. जायस्वाल महाविद्यालय,
अर्जुनी/मोर, जि. गोंदिया
spz.1991@gmail.com

---

**सारांश :**

एकविसाव्या शतकात माहिती तंत्रज्ञान आणि संवादाच्या क्षेत्रात अमुलाग्र क्रांती झाल्याचे आढळून येते. याचाच उपयोग ग्रामीण शिक्षणाच्या विकास आणि विस्तारासाठी करून घेण्यात येत आहे. भारताने शिक्षण क्षेत्रात टाकलेले प्रगतीचे नवीन पाऊल म्हणजे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० होय. या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये शालेय आणि उच्च शिक्षणात मोठ्या प्रमाणात परिवर्तनात्मक सुधारणांना वाव असल्याचे दिसते. या धोरणातील शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावरील शिक्षण हा विचार अधिक विस्तृत, बहुशाखीय आणि रचनावादी दृष्टिकोणावर आधारित आहे. सोबतच शिक्षक गुणवत्तेवर भर देण्यासाठी या शैक्षणिक धोरणात व्यवस्था केलेली आहे. शैक्षणिक विकासाची ही प्रक्रिया टप्प्याटप्प्याने हळूहळू अधिक चांगले यश संपादन करील अशी आशा वाटते. हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण म्हणजे आत्मनिर्भर भारतासाठी, नवनिर्माणासाठी सज्ज होण्याच्या दिशेने टाकलेले एक उत्तम पाऊल आहे.

**किवर्ड :** नवे शैक्षणिक धोरण, रचनात्मक बदल, माहिती तंत्रज्ञान.

**प्रस्तावना :**

भारतीय शिक्षण व्यवस्थेतील स्वरूपाचा विचार करता दिसून येते की, भारतीय शिक्षणाचा विकास दोन भागात विभागला आहे. एक म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळ आणि दुसरा स्वातंत्र्योत्तर काळ. ब्रिटीश आणि भारत सरकारने नियुक्त केलेल्या विविध आयोगांमुळे आजच्या शिक्षणाला एक नवा आकार किंवा दिशा प्राप्त झाली आहे. भारतातील शिक्षणाची पुरातन पद्धत म्हणजे पाठांतर करणे. या व्यवस्थेत दोन प्रकारचे विद्यार्थी तयार केले जात होते. एक फक्त पाठांतरनिपूण ज्यांचा उद्देश ज्ञानाचे हस्तांतरण करणे तर दुसरा प्रकार म्हणजे ज्ञानात तरबेज हा विद्यादानाचे कार्य करीत असे. नंतरच्या शिक्षण व्यवस्थेत बदल होऊन लहान मुलांना घरी शिकविणे, ठराविक वयात पूर्व प्राथमिक व प्राथमिक शिक्षण शाळेत देणे त्यानंतर माध्यमिक शिक्षण, त्यानंतर व्यावसायिक किंवा उच्च माध्यमिक पुढे पदवी व पदव्युत्तर शिक्षण व शेवटी संशोधन अशी रचना होती.

भारत स्वतंत्र झाला त्या वेळी साक्षरतेचे प्रमाण केवळ १८ टक्के होते. भारतामध्ये त्यावेळेस केवळ १९ विद्यापीठे व ४०० शाळा होत्या. अर्थातच अशावेळी शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे, जास्तीत जास्त लोकांना शिक्षणाची संधी मिळेल हे बघणे सरकारची प्राथमिकता होती. परिणामी जास्तीत–जास्त लोकांना किमान शिक्षण कसे मिळेल या दृष्टीने धोरण आखायला सुरुवात केली. १९५० मध्ये भारतीय नियोजन आयोगाची स्थापना झाल्यानंतर आयोगाने भारतीय शिक्षण व्यवस्थेलाही प्राथमिक शिक्षणाचा प्रसार, साक्षरता, तांत्रिक व कौशल्य विकसित करणारे शिक्षण, शिक्षणाचे आधुनिकीकरण व देशातील प्रत्येक जिल्ह्यात उच्च शिक्षण देण्यासाठी महाविद्यालय सुरू करणे ही पाच उद्दिष्टे ठेवली. शिक्षण हे केंद्र सरकार व राज्य सरकार

यांची सामाजिक जबाबदारी मानली गेली. स्वतंत्र भारतात शिक्षणाच्या प्रसारासाठी प्रयत्न सुरू असतांना दुसरीकडे उच्च शिक्षण व शैक्षणिक धोरण यांचा विचार सुरू झाला. उच्च शिक्षणाच्या विकासाची १९५३ साली भारतीय विद्यापीठ अनुदान आयोग स्थापूण, विद्यापीठातून मिळणाऱ्या उच्च शिक्षणाची जबाबदारी या आयोगाकडे सोपविली उच्च शिक्षणाचा प्रसार होत असतांनाच आजही दर्जेदार आणि रोजगारक्षम उच्च शिक्षण सर्वसामान्यांपासून, विशेषत: वंचित व उपेक्षित घटकांपासून दूर असल्याचे दिसते.

भारत स्वतंत्र होण्याच्या आधीच्या काळात अनेक शिक्षण आयोग नेमले गेले. यात १८५४ चा वूडस् अहवाल, १९८२ चा हंटर अहवाल, १९०२ चा रेली आयोग भारत स्वतंत्र झाल्यानंतर राधाकृष्णन आयोग, कोठारी आयोग, १९८६ चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अशा एकापाठोपाठ आयोगांनी वेळोवेळी शिक्षण व्यवस्थेत कोणते बदल आवश्यक आहेत हे सुचविले. नुकतेच डॉ. कस्तूरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या आयोगाने काही बदल सुचविले आहेत. हे बदल म्हणजेच नवे शै़क्षणिक धोरण २०२० होय.

**नव्या शैक्षणिक धोरणाची वैशिष्ट्ये :**

**शालेय शिक्षण :**

- १० + २ ऐवजी ५ + ३ + ३ + ४ हा शालेय अभ्यासक्रम आकृतिबंध.
- किमान पाचवीपर्यंतचे शिक्षण मातृभाषा/प्रादेशिक भाषेत.
- राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मुळे २ कोटी शाळाबाह्य मुले मुख्य प्रवाहात येतील.
- विद्यार्थ्यांचे प्रगती पुस्तकासह मूल्यांकन सुधारणा व विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात येणार.
- पायाभूत साक्षरता व सांख्यिकी यावर भर.
- एनसीईआरटी द्वारे एक नवीन आणि सर्वसमावेशक राष्ट्रीय शालेय शिक्षण अभ्यासक्रम रूपरेषा विकसित केली जाईल.
- २०३० पर्यंत शालेय शिक्षणात १०० टक्के जीईआर सह पूर्व ते माध्यमिक स्तरापर्यंतच्या शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण.

**उच्च शिक्षण :**

- नॅशनल रिसर्च फाउंडेशनची स्थापना केली जाईल याद्वारे प्रबळ संशोधन संस्कृती व उच्च शिक्षणामध्ये संशोधन क्षमता वृद्धिंगत करण्यात येईल.
- या धोरणात व्यापक आधारभूत, बहुशाखीय, लवचिक अभ्यासक्रमासह सर्वसमावेशक पदवी शिक्षण अभ्यासक्रम, बहु प्रवेश आणि निर्गम पदवी शिक्षण ३ किंवा ४ वर्षाचे असू शकते.
- ॲकेडेमिक बँक ऑफ क्रेडिट ची स्थापना.
- बहुशाखीय शिक्षण आणि संशोधन विद्यापीठांची स्थापना, आयआयटी, आयआयएम च्या तोडीचे देशातील जागतिक दर्जाच्या सर्वोत्कृष्ट बहुशाखीय शिक्षणासाठी आदर्शवत म्हणून स्थापन केले जातील.
- भारतीय उच्च शिक्षण आयोगाची (एचईसीआय) स्थापना करण्यात येईल. वैद्यकीय आणि कायदेशीर शिक्षण वगळता उच्च शिक्षणाशी संबंधित एकमेव उच्च संस्था असेल. एचईसीआय चे चार घटक असतील – नियमनासाठी राष्ट्रीय उच्च शिक्षण नियामक परिषद (एनएचईआरसी), दर्जात्मक

व्यवस्थेसाठी जनरल एज्युकेशन कौन्सिल (जीईसी) निधीसाठी उच्च शिक्षण अनुदान परिषद (एचईजीसी) आणि मूल्यांकनासाठी राष्ट्रीय मूल्यांकन परिषद (नॅक) असेल.

- २०३५ पर्यंत जीईआर ५० टक्के पर्यंत वाढविणे, उच्च शिक्षण संस्थांमध्ये ३.५ कोटी नवीन जागा वाढविण्यात येतील.

**इतर :**

- नॅशनल एज्युकेशन टेक्नॉलॉजी फोरम (एनइटीएफ) म्हणजेच राष्ट्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान मंच या स्वायत्त संस्थेची निर्मिती करण्यात येणार असून याद्वारे विचारांच्या देवाणघेवाणीसाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येणार आहे.
- महाविद्यालयाची संलग्नता १५ वर्षात टप्प्याटप्प्याने तयार केली जाणार आहे आणि महाविद्यालयांना पातळी आधारित यंत्रणेच्या माध्यमातून श्रेणीबद्ध स्वायत्तता देण्यात येईल कालांतराने एकतर स्वायत्त पदवी देणारे महाविद्यालय किंवा विद्यापीठाचे घटक महाविद्यालय म्हणून विकसित होईल.
- नवीन धोरणामध्ये बहुभाषिकतेला प्रोत्साहन देण्यात आले आहे. यासाठी राष्ट्रीय संस्थेची स्थापना केली जाईल.
- शैक्षणिक क्षेत्रामध्ये सार्वजनिक गुंतवणूक वृद्धीसाठी केंद्र आणि राज्य सरकारे एकत्रित काम करणार ही गुंतवणूक जीडीपीच्या ६ टक्के पर्यंत वाढविण्यावर भर आहे.

**मातृभाषेतून शिक्षणाची रचना :**

आज इंग्रजी भाषा अवगत असणे म्हणजेच सर्वकाही मिळविणे, खरे शिक्षण प्राप्त होते, रोजगाराच्या संधी निर्माण होतात व सामाजिक संधी प्राप्त होते असा गैरसमज दिसून येतो. त्यामुळे इंग्रजी शाळांचे सर्वत्र पेव फुटले आहे. हे सर्व मातृभाषेतून शिक्षण घेऊनही साध्य झाले असते. आपण आपल्या शिक्षण व्यवस्थेत मातृभाषा ही ज्ञानभाषा म्हणून समृद्ध करण्यात आपण पूर्णत: यशस्वी झालेलो नाही. मातृभाषेवर आधारित अभ्यासक्रमाचे आकलन विद्यार्थ्यांना उत्तम होऊन त्यांच्या विकासावर सकारात्मक प्रभाव दिसतो. म्हणूनच या नवीन शैक्षणिक धोरणात मातृभाषेतून/बोलीभाषेतून किमान इयत्ता ५ वी पर्यंत किंवा ८ वी पर्यंत शिक्षण द्यावे व कुठल्याही विद्यार्थ्यांवर कोणतीही भाषा लादली जाणार नाही असे नमूद आहे. या धोरणात मातृभाषेतून शिक्षणाला महत्त्व दिले असून मातृभाषेतून ज्ञानाची रचना करण्याचा उद्देश दिसून येतो.

**व्यावसायभिमुख शिक्षण :**

नव्या शैक्षणिक धोरणानुसार इयत्ता सहावीपासून विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण घेणे बंधनकारक असणार आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने एकतरी व्यावसायिक कौशल्य शिकावे अशी अपेक्षा नवीन शैक्षणिक धोरणानुसार करण्यात आली आहे. उच्च शिक्षणातील प्रवेश हा या शिक्षणावर अवलंबून असेल. भारतात यापूर्वी व्यावसायिक शिक्षणाला कधीही इतके महत्व देण्यात आले नव्हते. शिक्षणाला जीवनोपयोगी बनवणे हे यामागचे कारण आहे.

**अभ्यासक्रमाची रचना :**

पूर्वी भारतात गुरुकुल शिक्षण पद्धती अस्तित्वात होती. विद्यार्थी गुरुगृही राहून शिक्षण घेत असत. परिणामी आचार्यांचे संस्कार विद्यार्थ्यांवरही होत असत. सध्याच्या शिक्षण व्यवस्थेत पाश्चात्त्य विचारसरणीचा प्रभाव असून सोबतच विभक्त कुटुंब पद्धती, आई–वडील दोन्हीही चाकरीमुळे, कामाच्या व्यवस्थेमुळे

मुलांमध्ये एकाकीपणा जाणवतो परिणामी बऱ्याचदा मुलांच्या बौद्धिक विकासात अनेक अडचणी येतात. प्रचलित शिक्षणव्यवस्थेत विद्यार्थी मानसिक रुग्ण बनत चालला आहे. यादृष्टीने विचार करता नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील अभ्यासक्रमाची मांडणी ही ज्ञान रचनावादावर आधारलेली असून शोधक विचार क्षमता, परस्पर सहकार्य, बहुभाषिकता, सर्जनशीलता, समस्येचे निराकरण, आकलन आणि कसे शिकायचे ते शिकण्याच्या दिशेने वाटचाल करणे या संज्ञानात्मक विकासाबरोबरच चारित्र निर्माण आणि कौशल्य विकास यांचा अंतर्भाव दिसतो. या आधारे सर्वांगीण विकास झालेला नागरिक घडविण्याचे कार्य हा अभ्यासक्रम दर्शवितो.

नवीन शैक्षणिक राष्ट्रीय धोरणामुळे पूर्वीच्या १० + २ + ३ या आकृतिबंधाऐवजी ५ + ३ + ३ + ४ हा नवीन शिक्षण आराखडा अनुक्रमे ३ ते ८, ५ ते ११, ११ ते १४ व १४ ते १८ या वयोगटांसाठी राहील. या धोरणातील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे ३ ते ६ वर्ष हा आतापर्यंत समाविष्ट न झालेला वयोगट शालेय अभ्यासक्रमांतर्गत येईल. हा वयोगट बालकांच्या जडणघडणीच्या विकासासाठी अतिशय महत्त्वाचा मानला जातो. पूर्व प्राथमिक शिक्षण हे मूलभूत शिक्षण शिक्षणाचा पाया आहे. या आधारावर पुढील शिक्षण निर्भर असते. या नवीन धोरणात खेळ व शोधनावर आधारित अध्ययन प्रक्रिया घडवून आणल्या जाईल. म्हणजेच ३ ते ८ हा आकृतिबंध पायाभूत स्तर आहे. वय वर्षे ८ ते ११ हा स्तर तयारीचा स्तर म्हणून ओळखला जाईल. यामध्ये रचनात्मक अध्ययनावर भर राहील. वय वर्ष ११ ते १४ यामध्ये विषयांमधील संकल्पना रचनात्मक पद्धतीने शिकवीण्यावर भर दिला जाईल व वय वर्ष १४ ते १८ या स्तरामध्ये वैविध्य दिसून येते. या स्तरात विषयांचे पर्याय वाढतील. कला, विज्ञान आणि व्यावसायिक शैक्षणिक शाखा यामध्ये कठोर विभाजन राहणार नाही. अभ्यासक्रम हा खोलवर, अनुभवाधारित, प्रायोगिक, कृतीवर आधारित व्हावे याकरिता अभ्यासक्रमाचा भार कमी केला जाईल. हा आकृतिबंध मुलांच्या सर्वांगीण विकासाकरीता तयार केला असून त्यांच्या ज्ञानाच्या आकलनानुसार वयाचे टप्पे विचारात घेण्यात आले आहेत.

२०२२—२३ या वर्षापासून अंमलात येणाऱ्या या नव्या शैक्षणिक धोरणात शालेय शिक्षण, उच्च शिक्षण आणि संशोधन असे मुख्य तीन भाग आहेत. या माध्यमातून सर्वांना उच्च शिक्षण देऊन आपल्या राष्ट्राला सातत्याने न्याय व चैतन्यमय ज्ञानी समाजात परिवर्तीत करण्यास थेट योगदान देईल ही दूरदृष्टी मानलेली आहे. शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ (राईट टू एज्युकेशन ॲक्ट) यांचा विस्तार करून ३ वर्षापासून ते १८ वर्षापर्यंत करण्यात आला आहे. ही बाब विशेष स्वागतार्ह आहे. देशात किमान शिक्षणाचा टक्का वाढला असला तरी गुणवत्तेच्या बाबतीत आजही प्रश्नचिन्ह आहेत. सुमारे ४०,००० कॉलेज व ८०० पेक्षा जास्त विद्यापीठ असतांना विद्यार्थी नाव नोंदणीमध्ये प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या तुलनेत उच्च शिक्षणाचे प्रमाण २०१८ मध्ये २६.३ टक्के असून नव्या शैक्षणिक धोरणात ते ३०३५ पर्यंत किमान ५० टक्क्यांपर्यंत वाढण्याचे उद्दिष्ट ठेवलेले आहे. त्याचप्रमाणे नव्या धोरणात महिलांच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न, पूर्व प्राथमिक शिक्षणाकडे विशेष लक्ष व्यवसायिक शिक्षणाची आवश्यकता या मूल्यांचाही विचार नव्या धोरणात दिसतो. शिक्षणाच्या पहिल्या टप्प्यात विद्यार्थ्यांच्या मेंदूचा पूर्ण विकास होतो. दुस—या टप्प्यात विद्यार्थ्यांला औपचारिक शिक्षणासाठी शारीरिक व मानसिकरित्या तयार केले जाते. तिस—या टप्प्यात औपचारिक शिक्षणाला सुरुवात होऊन विद्यार्थी स्वत:च्या कल्पनाशक्तीला वापरायला सुरुवात करतो, त्याला प्रयत्नशील केले जाते आणि चौथ्या टप्प्यामध्ये नववी ते बारावी या टप्प्याचा विचार करतांना विषय अधिक सखोल, विचार व कृतीतून शिक्षण अशी ध्येय साकार करण्यासाठी त्यांना प्रयत्नशील केले जाते.

**निष्कर्ष :**

आजवर शिक्षण क्षेत्र हे मानव संसाधन मंत्रालयाच्या अधिपत्याखाली होते. नव्या राष्ट्रीय धोरणानुसार या मंत्रालयाचे नाव शिक्षण मंत्रालय असे करण्यात आले आहे. या आयोगाला दिशा देण्याचे काम देशातील नामांकित शिक्षणतज्ञ करणार आहेत. पहिल्यांदाच भारताचे शिक्षण क्षेत्र शिक्षण तज्ञांमार्फत संचालित आणि नियमित केले जाईल. एकूणच हे धोरण समग्र, एकात्म, भविष्यवेधी व सर्वसमावेशक असून पुढील २० वर्षात म्हणजेच २०४० पर्यंत या धोरणाचे संपूर्ण स्वरूप आकारास येईल अशी आशा आहे. नवे शैक्षणिक धोरण हे विद्यार्थी केंद्रीत, जागतिक स्पर्धेला लक्षात घेऊन सगळया घटकांचा विचार करून तयार करण्यात आले आहे. हे धोरण म्हणजेच भारताला जागतीक स्पर्धेमध्ये अग्रगण्य ठेवण्याकरीता उचललेले एक पाऊल आहे. निश्चितच या धोरणाचा सकारात्मक परिणाम होऊन भारत अनेक क्षेत्रात प्रगती साधेल याविषयी कुठलीही शंका नाही.

**संदर्भ :**

१. जोशी माधुरी (२०१९) : 'पूर्व ज्ञानातून घडते शिक्षणाची पाऊलवाट'.
२. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०१९ मसुदा.
३. 'राष्ट्रीय शिक्षा नीति २०२०', मनुष्यबळ विकास मंत्रालय अहवाल, भारत सरकार.
४. https://www.pmindia.gov.in